श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-६, अंक-४ | एप्रिल-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## विदेशी भाषा अभ्यास 'अ विन्डो टू द वर्ल्ड'!

आजच्या युगात 'बहुभाषिकता' केवळ महत्त्वपूर्ण नसून अत्यंत फायदेशीर आहे. परदेशी भाषेत संवाद करण्यास सक्षम असण्यामुळे लोकांशी सांस्कृतिक मैत्री जोडता येते आणि आपली मूळभाषाही चांगल्या प्रकारे समजते. वैयक्तिक, व्यावसायिक, सामाजिक आणि आर्थिक संपन्नता हे परदेशी भाषा शिकण्याचे फायदे आहेत.

अत्यंत लहान वयातच मुलांना स्वत:च्या 'बागेपलीकडे' एक सुंदर, समृद्ध, विस्तीर्ण जग आहे हे दिसले पाहिजे. एक नवीन भाषा शिकणे म्हणजे मुलांना त्यांची क्षितिजे विस्तारण्याची उत्तम संधी देणे, त्यांच्या आयुष्याला एक नवा दृष्टिकोन प्राप्त करून देणे होय. विद्यार्थ्यांना विविध भाषांविषयी आवड निर्माण व्हावी, देशांविषयी आपूलकी निर्माण होऊन 'वसुधैव कुटुंबकम्' ही भावना वृद्धिंगत व्हावी, आपले भविष्य समृद्ध करण्यासाठी विविध देशांमध्ये कारकीर्द घडवणे सुलभ जावे यासाठी डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इ. ५ वी पासून जर्मन व स्पॅनिश भाषा शाळेतच विद्यार्थ्यांना शिकविल्या जातात. इयत्ता तिसरी व चौथीतील विद्यार्थ्यांना स्पॅनिशची तोंड ओळख होण्यासाठी 'Budding Spanish' चे वर्ग घेतले जातात.

स्पॅनिश शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याला एक व्यासपीठ देण्यासाठी दरवर्षी 'स्पॅनिश डे' शाळेत साजरा केला जातो. नुकत्याच संपन्न झालेल्या ह्या कार्यक्रमाला डॉ. सविता केळकर, मानद संचालिका, फर्ग्युसन भाषा केंद्र व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासद, प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या वर्षीचा कार्यक्रम भारतीय संस्कृती आणि स्पॅनिश संस्कृतीमधील साम्य या संकल्पनेवर आधारित होता. या प्रसंगी शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार करून स्पॅनिश भाषा वर्ग सुरू करण्यामागची शाळेची भूमिका, विविध स्पॅनिश उपक्रम विशद केले.




*विद्यार्थ्यांनी तयार केलेले स्पॅनिश हस्तलिखित 'लास चिस्पास' चे अनावरण करताना डॉ. सविता केळकर*




*सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक कार्यातील प्रसंग स्पॅनिश भाषेत सादर करताना विद्यार्थी*

प्राथमिक ते उच्च माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांनी स्पॅनिश भाषेतून विविध कलाकृती सादर केल्या. इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यानी 'भोलानाथ' व 'ये रे ये रे पावसा' ही मराठी गाणी स्पॅनिश भाषेतून नृत्याद्वारे सादर केली. त्याचप्रमाणे स्पॅनिश भाषेतील 'चोकोलाते' गाणे व मराठी संस्कृतीतील झिम्मा, भारतातील दहीहंडी आणि स्पॅनिश दहीहंडी यांतील साधर्म्य, जेवणापूर्वीच्या भारतीय प्रार्थनेशी साम्य दाखविणारी स्पॅनिश प्रार्थना ह्या कलाकृती विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे सादर केल्या. सर्वांच्या मनात रुजलेले काही ऐतिहासिक प्रसंग विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे स्पॅनिश भाषेत सादर केले. यामध्ये 'शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका', 'पुण्यात मुलींची पाहिली शाळा सुरू केल्यानंतर लोकांनी सावित्रीबाईंना दिलेला त्रास', 'कमलाकरपंत वालावलकरसाहेबांची दिगंबरदास महाराजांवर असणारी अतुट श्रद्धा दाखविणारा संवाद' हे प्रसंग सादर करण्यात आले. स्पॅनिश गीतांवर नृत्ये सादर करण्यात आली. त्याचबरोबर स्पॅनिश भाषा शिकल्यामुळे पेरु देशात अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या श्री. अथांग जोशी यांच्याशी शाळेतील विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे संवाद साधला. विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने कु. सेजल यशवंतराव हिने स्पॅनिश भाषा शिक्षणातील स्वानुभव व्यक्त केले. या सर्व कार्यक्रमांना उपस्थित प्रेक्षकवर्गाने भरभरून दाद दिली.

वर्षभर चालणाऱ्या स्पॅनिश भाषा अभ्यासाच्या उपक्रमांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

सन्माननीय पाहुण्या डॉ. सविता केळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सर्व परदेशी भाषांच्या अध्ययनाने होणारे फायदे आणि त्यातून व्यावसायिक दृष्टीने मिळणाऱ्या विविध संधींविषयीची माहिती सांगितली. त्याचबरोबर जीवनातील खेळाचे आणि व्यायामाचे महत्त्वदेखील पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांना शाळेमध्ये मिळणाऱ्या प्रत्येक सोयीसुविधेचा लाभ घेत स्वत:ची प्रगती साध्य करण्यास सांगितले. कोणतीही नवीन गोष्ट शिकण्यासाठी वयाचे बंधन नसते ही गोष्ट आवर्जून आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केली व माउथ ऑर्गनवर एक गीत वाजवून सर्व प्रेक्षकवर्गाला मंत्रमुग्ध केले.

शाळेच्या स्पॅनिश भाषा शिक्षिका डॉ. कृपा कुलकर्णी, मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर, कल्पेश जुवेकर, उज्ज्वला जुन्नरकर व शिक्षिका श्रद्धा पराडकर, गीतांजली सकपाळ, वृषाली वरवाटकर, अश्विनी खांडेकर, अनन्या जोगळेकर, सतीश कावणकर, मंगेश जाधव, राहुल हेगिष्टे व अर्चना चोगले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी ऋचा कोवळे व श्रद्धा निमुणकर यांनी केले. या कार्यक्रमांत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी पालक, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व परदेशी पाहुणे उपस्थित होते.




*शाळेतील स्पॅनिश भाषा शिकणारा विद्यार्थी वर्ग*

# डेरवण येथे निरंतर परिचर्या शिक्षण कार्यशाळा

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८ मार्च २०१८ या दिवशी ‘भ.क.ल.वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण’ येथे निरंतर परिचर्या शिक्षण अंतर्गत मानसिक आरोग्य परिचर्या – Practice Updates या मुख्य विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाल्यानंतर कार्यशाळेला सुरुवात झाली. या कार्यशाळेला महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे निरीक्षक मा. श्री. रमेश बंडगर उपस्थित होते.

वालावलकर रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी जागतिक महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करून महिला दिनाचे महत्त्व विशद केले. समर्थ नर्सिंग कॉलेजच्या उपप्राचार्या सौ. बालामनी बोस यांनी उद्घाटनपर भाषणात महिला दिन साजरा करण्यामागची भूमिका विशद केली. ‘नर्सेसमधील ताण तणाव’ या विषयावर बोलताना डॉ. रामदास रणसिंग यांनी हा ताण कशा पद्धतीने कमी करावा या विषयी आपले विचार व्यक्त केले. डॉ. पद्मा ननावरे यांनी सर्वसामान्य मानसिक आजारांबद्दल माहिती देऊन हे आजार कसे ओळखावेत, या आजाराची लक्षणे व चिन्हे काय आहेत याबद्दल मार्गदर्शन केले. महिलांनी आपले मानसिक आरोग्य कसे जपावे, ताण तणाव कशा रितीने कमी करावेत याविषयी सौ. श्रद्धा सागवेकर यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

द्वितीय वर्ष पी.बी.बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थिनींनी परिचारिकेने आपले ताण तणाव ओळखून ते कसे कमी करावेत या विषयावर एक पथनाट्य सादर केले. या कार्यशाळेसाठी एकूण २४७ परिचारिका उपस्थित होत्या.




*व्यासपीठावर डॉ.सौ.सुवर्णा पाटील, वैद्यकीय संचालिका भ.क.ल.वालावलकर रुग्णालय, सौ.मेरी सेटिपल्ली, प्राचार्य समर्थ नर्सिंग स्कुल., श्री.रमेश बंडगर, डॉ.रामदास रणसिंग, मानसोपचार तज्ञ, डॉ.सौ.पद्मा ननावरे, मानसोपचार तज्ञ भ.क.ल. वालावलकर रुग्णालय*




*डावीकडुन सौ.मेरी सेटिपल्ली, प्राचार्य समर्थ नर्सिंग स्कुल., श्री.रमेश बंडगर, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल निरीक्षक, डॉ.रामदास रणसिंग, मानसोपचार तज्ञ भ.क.ल. वालावलकर रुग्णालय,*

# नवीन स्टेडियममध्ये रंगला खो–खोचा थरार

रत्नागिरी जिल्हा खो–खो संघटना आयोजित जिल्हास्तरीय किशोर आणि किशोरी अजिंक्यपद स्पर्धा दि. २४ मार्च २०१८ रोजी एसव्हीजेसीटीच्या क्रीडासंकुलात उत्साहात संपन्न झाली. क्रीडासंकुलात देशी खेळांच्या वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा आणि प्रशिक्षण शिबिरासाठी नव्यानेच तयार करण्यात आलेल्या बंदिस्त मैदानात खेळण्याचे अप्रूप उपस्थित खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक यांना होते. या स्पर्धेसाठी ७ किशोर आणि ७ किशोरीचे गटाचे संघ सहभागी झाले होते. जिल्ह्यातील दुर्गम असलेल्या आसगे, फणसवणे, मंडणगड, कोळबांद्रे (दापोली) आणि सनगले वाडी (संगमेश्वर) या विविध भागातून आलेल्या या १४ वर्षाखालील खेळाडूंनी




*भारतातील दहीहंडी आणि स्पॅनिश दहीहंडी यांतील साम्य स्पॅनिश डे च्या कार्यक्रमात प्रात्यक्षिकाद्वारे सादर करताना विद्यार्थी*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

उत्तम खेळ करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिकली. किशोर गटाच्या अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात तळवडे (लांजा) विरुद्ध कोळबांद्रे या सामन्यात कोळबांद्रे संघ विजयी ठरला तसेच किशोरी गटात सनगले वाडी संघाने मंडणगड संघावर विजय मिळविला. विजेत्या संघातील आणि उपस्थित विविध संघातील खेळाडूंची निवड चाचणी या वेळेस घेण्यात आली. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्याचा किशोर आणि किशोरी गटाचा संघ निवडण्यात आला. तो संघ एप्रिल महिन्यात सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. या निवडलेल्या संघाचे प्रशिक्षण शिबिरही दि. २८ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत येथेच आयोजित करण्यात आले आहे असे ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक संदीप तावडे यांनी सांगितले. मार्च महिन्यातील तळपते ऊन असूनही आधुनिक पद्धतीचे छत घालून तयार करण्यात आलेल्या मैदानामुळे साखळी पद्धतीने सामने खेळविता आले अशा भावना उपस्थित तांत्रिक समितीचे समीर काब्दुले आणि पंकज चवंडे यांनी व्यक्त केल्या.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून एप्रिल २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ.सुनील नाडकर्णी,पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ७/८ एप्रिल | डॉ.सतेज सबनीस, मुंबई (युरोलॉजिस्ट) | दुर्बिणीद्वारे मुतखड्यांची शस्त्रक्रिया |
| ०८ एप्रिल | डॉ.आनंद जोशी , मुंबई (गॅस्ट्रोएंटरोलॉजिस्ट ) | पचनसंस्था तपासणी व उपचार |
| १५ एप्रिल | डॉ.के.एस.कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| १५ एप्रिल | डॉ.अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार तज्ज्ञ |
| २०/२१ एप्रिल | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कॅन्सर शस्त्रक्रिया व उपचार |
| २१ एप्रिल | डॉ.श्रीपाद बाणवली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २१ एप्रिल | डॉ.सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तपासणी व उपचार |
| २१ एप्रिल | डॉ.शिवप्रसाद दाते, मुंबई. (प्लास्टीक सर्जन ) | भाजलेले व्रण, डाग शस्त्रक्रिया व उपचार |
| २२ एप्रिल | डॉ.के.मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| | डॉ.निर्मला सरपोतदार, (ऑफ्तल्मालॉजिस्ट) | मोतिबिंदू शस्त्रक्रिया तज्ज्ञ |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना 'श्रवणयंत्र' (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**

**डोहाळेजेवण व सासू सून मेळावा** – १७ एप्रिल वालावलकर रुग्णालय येथे

**सहा महिन्यांचे वाढदिवस** – ६ एप्रिल वालावलकर रुग्णालय येथे

**सरपंच मेळावा** – २२ एप्रिल

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर